महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषद व जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. निप्रप-२०२०/प्र.क्र.२८/उद्योग-७
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १९ ऑक्टोबर, २०२०

वाचा :- १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. मऔधो २०१९/प्र.क्र.६/उद्योग-२, दि. ०७ मार्च, २०१९.
२) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. केंशासं २०१८/ प्र.क्र.१२६ / उद्योग-७, दि. ०४ सप्टेंबर २०१८.

**प्रस्तावना :-**

आंतरराष्ट्रीय व्यापारामधील देशाचा सहभाग हा आर्थिक कामगिरीचा महत्वाचा मापदंड आहे. राज्यातर्फे आंतराष्ट्रीय व्यापारामध्ये मोठया प्रमाणात सहभाग वाढविण्यासाठी विविध पुढाकार घेण्यात येत आहेत. निर्यात व्यूहरचना आखण्याकरीता एक अभ्यास अहवाल तयार करण्यात आलेला असून, त्यामध्ये वस्त्रे, अभियांत्रिकी वस्तू, कृषी उत्पादन आणि प्रक्रियाकृत खाद्य पदार्थ, आयटी/आयटीईएस, ॲटो व ॲटोचे सुट्टे भाग, औषधे व रसायने ही प्रमुख क्षेत्रे निर्यात वाढीसाठी अधोरेखित करण्यात आली आहेत. केंद्र शासनाने विविध औद्योगिक क्षेत्रासाठी वाणिज्य मंत्रालय यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली विविध निर्यात प्रचालन परिषदा (Export Promotion Council (EPCC)) व कमोडिटी बोर्ड यांची स्थापना केलेली आहे. निर्यात प्रचालन परिषदा संबंधित क्षेत्रातील निर्यात वृध्दीसाठी मार्गदर्शन व समन्वयासाठीची विविध कार्ये केंद्र शासनाच्या निर्देशानुसार कार्यरत आहेत. राज्यातील लघु व मध्यम उद्योगांना आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहाय्य करण्यासाठी तसेच राज्यातील संभाव्य निर्यात क्षमता असलेल्या विविध क्षेत्रामधून निर्यातवृध्दी होण्यासाठी देशामध्ये अस्तित्वात असलेल्या निर्यात परिषदांच्या धर्तीवर महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषद (Maharashtra Export Promotion Council (MEPCC)) स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यास्तव शसन निर्णय उदयोग विभाग क्र. **केंशासं २०१८/प्र.क्र.१२६/उद्योग-७,** दिनांक ०४ सप्टेंबर २०१८ अन्वये राज्य निर्यात प्रोत्साहन समिती निरसित करुन खालील प्रमाणे सुधारित राज्य स्तरीय निर्यात प्रचालन समिती व जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती गठीत करण्याचे प्रस्तावित आहे.

**शासन निर्णय :-**

देशाच्या एकूण निर्यातीमध्ये राज्याचा वाटा वाढविण्यासाठी राज्यातील लघु व मध्यम उद्योगांना आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहाय्य तसेच राज्यातील संभाव्य निर्यात क्षमता असलेल्या विविध क्षेत्रामधून निर्यातवृध्दी होण्यासाठी आणि निर्यातदारांमध्ये जागरुकता आणून त्यांना स्पर्धात्मक बनविण्यासाठी तसेच राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने तसेच उद्योजकांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी राज्यात महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषद (Maharashtra Export Promotion Council (MEPC)) ची स्थापन करण्यास शासन मान्यता देत आहे.

**(१) राज्य निर्यात प्रचालन परिषदेची रचना :-**

राज्य निर्यात प्रचालन परिषदेची स्थापना मा. मंत्री (उद्योग) यांचे अध्यक्षतेखाली करण्यात येत असून, परिषदेमध्ये निर्यात संबंधी इतर विभागाचे प्रशासकीय/विभाग प्रमुख यांचा समावेश असेल. महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषद (Maharashtra Export Promotion Council (MEPC)) ची रचना खालीलप्रमाणे असेल.

| | | |
|---|---|---|
| १ | मा.मंत्री (उद्योग), महाराष्ट्र शासन. | अध्यक्ष |
| २ | मा. राज्यमंत्री (उद्योग), महाराष्ट्र शासन. | उपाध्यक्ष |
| ३ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (उद्योग),मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (कृषी), मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ५ | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव, विमान चालन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ७ | मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई. | सदस्य |
| ८ | आयुक्त,राज्य वस्तू व सेवाकर, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ९ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ,मुंबई | सदस्य |
| १० | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ | सदस्य |
| ११ | कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ | सदस्य |
| १२ | अतिरिक्त महासंचालक, विदेश व्यापार महासंचालनालय, मुंबई | सदस्य |
| १३ | विकास आयुक्त, सिप्झ,विशेष आर्थिक क्षेत्र, अंधेरी (पूर्व), मुंबई-९६ | सदस्य |
| १४ | राज्यातील निर्यात प्रचालन संघटना जसे FIEO / WTC, प्रमुख औद्योगिक संघटना इत्यादी यांचे प्रतिनिधी (किमान ३) | विशेष निमंत्रित |

| | | |
|---|---|---|
| १५ | विकास आयुक्त (उद्योग) तथा राज्य निर्यात आयुक्त, उद्योग संचालनालय, मुंबई. | सचिव |

सदर परिषदेमध्ये, आवश्यकतेनुसार संबंधित मंत्री महोदय व सचिव यांना विशेष निमंत्रित सदस्य म्हणून बोलविण्यात येईल तसेच राज्यातील निर्यातवृध्दीसाठी कार्यरत असणाऱ्या संबंधित कार्यालये / औद्योगिक संघटना यांना आवश्यकतेनुसार अध्यक्षाच्या मंजूरीने विशेष निमंत्रित म्हणून नियुक्त करण्यात येईल. परिषदेच्या बैठकांचे आयोजन व विविध कार्यालयाशी समन्वय इ. बाबी उद्योग संचालनालय यांच्याकडून हाताळण्यात येतील. प्रस्तुत परिषदेच्या बैठकांचे आयोजन किमान ६ महिन्यातून किमान एकवेळा अथवा आवश्यकतेनुसार करण्यात येईल.

**२) राज्य निर्यात प्रचालन परिषदेची उद्दीष्टे-**

१. राज्यातून निर्यातवृध्दी होण्यासाठी विविध धोरणात्मक बाबीचे अवलोकन करुन संभाव्य क्षेत्राची निवड करणे.

२. राज्यातील निर्यात वाढविण्याच्या दृष्टीने सल्ला देणे. याशिवाय निर्याती संदर्भात विविध सवलती/ प्रोत्साहने देणे संदर्भात राज्य शासनाला योग्य त्या सुचना करणे.

३. केंद्र शासनाच्या निर्यातीच्या धोरणात्मक बाबीचा आढावा घेणे व त्या अनुषंगाने राज्याच्या निर्यात वृध्दी करिता सुधारणा करणे आवश्यक असेल तर त्या सुचविणे.

**(३) राज्य निर्यात प्रचालन परिषदेची कार्ये:-**

१) देशातंर्गत तसेच आंतरराष्ट्रीय भागधारक, शासकीय यंत्रणा आणि आंतरराष्ट्रीय संस्था बरोबर समन्वय.

२) निर्यात प्रचालनासाठी राज्याचा आराखडा तयार करणे.

३) निर्यात करणाऱ्या घटकांना/उद्योजकांना निर्यातीबाबत माहिती पुरविणे आणि त्यांच्या अडी-अडचणींचे / तक्रारीचे निराकरण करणे.

४) जागतिक स्तरावर उत्पादने, सेवा आणि ब्रँण्ड यांच्या मागणीबाबत निर्यातीसंबंधी बौधिक माहिती कक्ष स्थापन करणे व निर्याती संबंधी आवश्यक ती माहिती उपलब्ध करणे.

५) राज्यामध्ये निर्यात वृध्दीसाठी लागणारे आवश्यक विविध धोरणे, कार्यक्रमांची आखणी व आयोजन करणे.

६) केंद्र शासनाच्या निर्यातीच्या धोरणात्मक बाबीचा आढावा घेणे व यामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक असेल तर त्या सुचविणे.

**(४) राज्य निर्यात प्रचालन परिषद- "कार्यकारी समिती" -**

राज्यातील निर्यात वाढीसाठी विविध केंद्र व राज्य कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यातदार व निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा, समन्वय व

अडीअडचणी दुर करण्याच्या दृष्टीने निर्यात प्रचालन परिषदेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य निर्यात प्रचालन परिषदेची "कार्यकारी समिती" गठित करण्यात येत आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे असेल.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव (उदयोग) उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग | सदस्य |
| ३ | प्रधान सचिव (ऊर्जा) उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग | सदस्य |
| ४ | विकास आयुक्त (उद्योग) तथा राज्य निर्यात आयुक्त, उद्योग संचालनालय, मुंबई. | सदस्य |
| ५ | मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई. | सदस्य |
| ६ | आयुक्त ,राज्य वस्तू व सेवाकर, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ७ | कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ | सदस्य |
| ८ | कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ९ | सह महासंचालक, विदेश व्यापार महासंचालनालय, (पश्चिम विभाग), मुंबई | सदस्य |
| १० | संचालक, एक्स्पोर्ट क्रेडीट गॅरेंटी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया | सदस्य |
| ११ | संचालक, साफ्टवेअर तंत्रज्ञान (एसटीपीआय), मुंबई / पुणे | सदस्य |
| १२ | संचालक,सुक्ष्म,लघु,मध्यम उपक्रम(एमएसएमई) संस्थान, मुंबई | सदस्य |
| १३ | अध्यक्ष, अभियंता निर्यात प्रचालन परिषद, मुंबई | सदस्य |
| १४ | अध्यक्ष, वस्त्रोद्योग निर्यात प्रचालन परिषद, मुंबई | सदस्य |
| १५ | अध्यक्ष, केमिकल निर्यात प्रचालन संस्था, मुंबई. | सदस्य |
| १६ | अध्यक्ष, जेम्स अँन्ड ज्वेलरी एक्सपोर्ट प्रमोशन काऊन्सील, मुंबई | सदस्य |
| १७ | अध्यक्ष, कृषी निर्यात प्रचालन संस्था, मुंबई. | सदस्य |
| १८ | अध्यक्ष, एक्सपोर्ट प्रमोशन काऊन्सील फॉर लेदर गुडस्, मुंबई | सदस्य |
| १९ | राज्यातील निर्यात प्रचालन संघटना जसे FIEO / WTC , औद्योगिक संघटना इत्यादी यांचे प्रतिनिधी | विशेष निमंत्रित सदस्य |
| २० | विभागीय अधिकारी/संचालक, व्यापारी वस्तू बाजार बोर्ड- स्पायसेस, काथ्या इ. , मुंबई | विशेष निमंत्रित सदस्य |
| २१ | उप सचिव (उदयोग-७) उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग | सचिव |

कार्यकारी समितीमध्ये राज्यातील निर्यातवृध्दीसाठी कार्यरत असणाऱ्या संबंधित कार्यालयाशी संबंधित अधिकारी, निर्यातदार, निर्यात सल्लागार व औद्योगिक संघटना यांना आवश्यकतेनुसार अध्यक्षाच्या मंजूरीने विशेष निमंत्रित म्हणून नियुक्त करण्यात येईल. परिषदेच्या बैठकांचे आयोजन व विविध कार्यालयाशी समन्वय इ. बाबी उद्योग संचालनालय

यांच्याकडून हाताळण्यात येतील. प्रस्तुत परिषदेच्या बैठकांचे आयोजन ३ महिन्यातून किमान एक वेळा अथवा आवश्यकतेनुसार करण्यात येईल.

(५) **जिल्हा निर्यात प्रचालन समिती-**

केंद्रशासनाच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या विदेश व्यापार महासंचालनालय, नवी दिल्ली यांनी दि.२६/१२/२०१९ च्या पत्रान्वये "जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती (Export Promotion Council)" गठीत करण्यासंबंधी सूचना केली आहे. जिल्ह्यातील निर्यात वाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा , समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेची "समिती" गठित करण्यात येत आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे असेल.

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | विदेश व्यापार महानिदेशालय (Director General of Foreign Trade) चे प्रतिनिधी | उपाध्यक्ष |
| ३. | जिल्हा वस्तू व सेवाकर अधिकारी | सदस्य |
| ४. | जिल्हा अग्रणी बक व्यवस्थापक | सदस्य |
| ५. | जिल्ह्यातील दोन महत्वाच्या निर्यात प्रचालन परिषदेची प्रतिनिधी | सदस्य |
| ६. | जिल्ह्यातील दोन महत्वाच्या औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७. | नाबार्ड/ ॲपेडा चे अधिकारी | सदस्य |
| ८. | संचालक, सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९. | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | सदस्य |
| १०. | आवश्यकतेनुसार विविध जिल्हा स्तरीय अधिकारी /निर्यातदार /सल्लागार/औदयोगिक संघटना | निमंत्रित सदस्य |
| ११. | महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र (Convener) | सचिव |

समितीमध्ये राज्यातील/ जिल्ह्यातील निर्यातवृद्धीमध्ये कार्यरत असणा-या संबंधित कार्यालयाशी संबंधित अधिकारी, निर्यातदार, निर्यात सल्लागार व औद्योगिक संघटना यांना आवश्यकतेनुसार अध्यक्षाच्या मंजूरीने विशेष निमंत्रित म्हणून नियुक्त करण्यात येईल. प्रस्तुत परिषदेच्या बैठकांचे आयोजन महिन्यातून एक वेळा अथवा आवश्यकतेनुसार करण्यात येईल.

**(६) समितीची कार्ये :-**

१. वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार व राज्य शासन यांच्यामध्ये समन्वय साधून जिल्ह्यांना निर्यात केंद्र बनविण्यासाठी प्रयत्न करणे.

२. जिल्ह्यांना निर्यात केंद्र म्हणून विकसित करुन निर्यात वृद्धीसाठी प्रयत्न करणे.

३. निर्यातीसाठी नवीन क्षेत्राची निवड करणे.

४. जिल्ह्यामधील पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठीचे अडथळे ओळखून निर्यातीसाठी पुरक धोरण राबविणे.

**(७) कार्य विषयक बाबी :-**

१. राज्य निर्यात प्रचालन परिषदेचे कार्यालय राज्य शासनाच्या उद्योग विभागाच्या अधिपत्याखालील "मैत्री" कक्षात स्थापित करण्यात येईल.

२. राज्य निर्यात प्रचालन परिषदेच्या बैठकीची विषयपत्रिका ठरविणे, निमंत्रणे निर्गमित करणे, कार्यवृत्त तयार करणे, विविध कार्यालयाशी समन्वय व अन्य बाबी विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय यांनी सांभाळाव्यात.

३. राज्य निर्यात प्रचालन परिषदेचे कार्यान्वयन परिणामकारकपणे होण्यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ, सल्लागार इ. कंत्राटी पध्दतीवर परिषदेच्या मान्यतेने घेण्यात येईल व त्याबाबतचा वेळोवेळी आढावा घेण्यात येईल.

४. राज्य निर्यात प्रचालन परिषद, कार्यकारी समितीची बैठक, परिषदेचे संचलन व कार्यान्वयनसाठी आवश्यक लागणारे मनुष्यबळ सल्लागार इ. कार्यालयीन व अनुषंगिक खर्च अध्यक्षाच्या मान्यतेने करण्यात येईल.

५. राज्य निर्यात प्रचालनबाबतच्या राज्य शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी परिषदेकडून समन्वय साधण्यात येवून राज्यातील निर्यात वृध्दीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील.

६. राज्य निर्यात प्रचालन परिषद व कार्यकारी समितीची बैठक विहित कालावधीत घेण्यात यावी.

"नवीन औद्योगिक धोरण -२०१९" मध्ये निर्यात घटकांसाठी समन्वय करण्याकरिता "मैत्री संस्थेमध्ये" स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यानुसार "राज्य निर्यात प्रचालन परिषदेचे" संचालन व कार्यान्वय करण्याच्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चासाठी उद्योग संचालनालयामार्फत स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यास काही अवधी लागण्याची शक्यता आहे. तसेच केंद्र शासनाच्या वाणिज्य मंत्रालयाने निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा स्तरावर निर्यात प्रचालन समिती तात्काळ गठीत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे सदर राज्य निर्यात प्रचालन परिषद/ समिती यांच्या प्रयोजनासाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी नवीन लेखाशीर्ष उघडणे आवश्यक आहे. तथापि, त्यास काही कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामूळे

उद्योग संचालनालयास केंद्रशासनाने वरीलप्रमाणे दिलेल्या सूचना पाहता, उदयोग संचालनालयाच्या शिफारशी नुसार महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषद/ समितीच्या अनुषंगाने होणारा खर्च हा मैत्री कक्षासाठी खाली नमूद केलेल्या मुख्य लेखाशिर्षामध्ये या वर्षासाठी मंजूर केलेल्या तरतुदीमधून तात्पुरत्या स्वरुपात भागविण्यात यावा.

मागणी क्र. के-७,
मुख्य लेखाशिर्ष २८५२,
योजनातंर्गत योजना,
(००) (१५) मैत्री कक्षासाठी खर्च (कार्यक्रम)
संगणक सांकेतांक क्रमांक - (२८५२A०२२)

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२०१०२०१११५२०१०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(नितिन जो. डंगारे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रति :- माहतीसाठी व आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१) मा.मंत्री (उद्योग) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खासगी सचिव,मंत्रालय, मुंबई
३) अपर मुख्य सचिव (उदयोग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय. मुंबई
४) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (कृषी) मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव, विमान चालन, सामान्य प्रशासन विभाग. मंत्रालय, मुंबई.
७) मुख्य कार्यकारी अधिकारी,म.औ.वि.महामंडळ
८) राज्य वस्तू व सेवाकर आयुक्त, राज्य वस्तू व सेवाकर भवन,मुंबई.
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ,मुंबई
१०) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, मुंबई.
११) अतिरिक्त महासंचालक, विदेश व्यापार महासंचालनालय, मुंबई
१२) विकास आयुक्त, सिप्झ, विशेष आर्थिक क्षेत्र,अंधेरी (पूर्व) मुंबई-९६.
१३) विकास आयुक्त (उद्योग) तथा राज्य निर्यात आयुक्त, उदयोग संचालनालय, मुंबई.
१४) कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य
१५) सह मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ
१६) सह महासंचालक, विदेश व्यापार महासंचालनालय, पश्चिम विभाग, मुंबई
१७) संचालक, एसटीपीआय, मुंबई / पुणे

१८) संचालक, एमएसएमई संस्थान, मुंबई
१९) अध्यक्ष, अभियंता निर्यात प्रचालन परिषद, मुंबई
२०) अध्यक्ष, वस्त्रोद्योग निर्यात प्रचालन परिषद, मुंबई.
२१) अध्यक्ष, केमिकल निर्यात प्रचालन संस्था, मुंबई.
२२) अध्यक्ष, जेम्स अँन्ड ज्वेलरी एक्सपोर्ट प्रमोशन काऊन्सील, मुंबई
२३) अध्यक्ष ,कृषी निर्यात प्रचालन संस्था, मुंबई.
२४) अध्यक्ष, एक्सपोर्ट प्रमोशन काऊन्सील फॉर लेदर गुडस्
२५) विभागीय अधिकारी/संचालक, व्यापारी वस्तू बाजार बोर्ड- स्पायसेस, काथ्या इ.
२६) सह संचालक, सर्व विभाग, उद्योग संचालनालय, मुंबई, मार्फत.
२७) महाव्यवस्थापक, सर्व जिल्हे, उद्योग संचालनालय, मुंबई, मार्फत.
२८) निवडनस्ती (उदयोग-७).